# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in
( महसूल शाखा )

---

वाचले:- १. मे.नेहल इम्पोर्ट प्रा. लि., बी/८, रुस्तम मेन्शन, ३ रा मजला,५६२, अंडेवाला रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९ .यांचेकडील दि.१०/८/२०१७ चा अर्ज.
२. मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ मधील कलम २९
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. गौखनि-१०/१००९/प्र.क्र.३०९/ख, दि. ११/०२/२०१०
४. महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५.
५.परिरक्षण भूमापक, मुंबई शहर यांचेकडील स्थळपाहणी अहवाल दि. २३/८/२०१७

---

क्र.सीएसएलआर/मशा-२/आ.क्र.२६००८/प्र.क्र.१०९०/
माटुंगा/भूकर क्र.२६२/१०/प्लॉटनं.३६१/गौ.ख.प./२०१७. /391
दिनांक :- ३१/०८/२०१७ 31 AUG 2017

विषय : <u>जमीन : मुंबई शहर</u>
दादर माटुंगा महसूल विभागातील भूकर.क्र.१७ सी/१० प्लॉट नं. ५१४/सी या मिळकतीमधून खोदकाम करुन १०७ ब्रास गौणखनिज उत्खननास परवानगी मिळणेबाबत.

आदेश :-

मे.नेहल इम्पोर्ट प्रा. लि., यांनी उपोद्घातातील १ प्रमाणे या कार्यालयास दि.१०/८/२०१७ रोजीचे अर्जाने दादर माटुंगा महसूल विभागातील भूकर क्रमांक **१७सी/१० प्लॉट क्र.५१४/सी** मुंबई या मिळकतीमधून एकूण **१०७ ब्रास** गौणखनिजे काढण्यास परवानगी मागितलेली आहे. अर्जदार यांनी सदर पत्रासोबत लागणारी कागदपत्रे जोडलेली आहे. तसेच त्यांनी रक्कम रु. ४४,५००/- चा भरणा Online ग्रास प्रणालीने, **GRN No – MH००४७३९८१३२०१७१८E**, दि.२३/०८/२०१७ रोजीचे चलान द्वारे केलेला आहे. अर्जदार यांनी अर्ज शुल्क र. रु.५००/- चा भरणा अनुज्ञप्ती शुल्काबरोबरच केलेला आहे.

सबब गौण खनिज काढण्यास सादर केलेल्या कागदपत्रास अनुसरुन मे.नेहल इम्पोर्ट प्रा. लि., यांना वर नमूद जमिनीमधून खोदकाम करुन १०७ ब्रास गौण खनिज (मुरुम, दगड व माती काढणेस) उत्खननास मी श्री. बन्सी गवळी, अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ मधील नियम २९ व महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५ प्रमाणे मला प्राप्त अधिकारानुसार खालील अटी व शर्तीवर परवानगी देत आहे.

१. सदरचे जमिनीचे खोदकाम करतांना लगतचे जमिनीवरील इमारतीला कोणताही धोका पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबत अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या बंधपत्राचे पालन करावे.
२. खोदकाम केल्यानंतर उत्खननाने निघालेली माती अगर इतर गौणखनिज कोणत्याही शासकीय जमिनीवर टाकण्यात येवू नये. उत्खनन केलेली माती ज्या जागेवर टाकणार आहेत, त्या जागेच्या मालकाची परवानगी घ्यावी. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांची परवानगी घ्यावी.
३. उत्खननाबाबत या आदेशापासून <u>एक</u> महिन्याची मुदत देण्यात येत आहे.
४. मंजूर केलेल्या गौणखनिजापेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

५. मुदतीत उत्खनन झाल्याचा अहवाल अर्जदाराने सादर करावा व त्याप्रमाणे या कार्यालयाचे प्रतिनिधिमार्फत प्रमाणित करावे.

६. उत्खनन करण्यास परवानगी दिलेली आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागेतून उत्खनन करु नये. तसे आढळल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

७. कांदळवनावर भराव केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुढील मुदतवाढ मिळणार नाही.

29/8/2017
(बन्सी गवळी)
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत :-

१. मे.नेहल इम्पोर्ट प्रा. लि., बी/८, रुस्तम मेन्शन, ३ रा मजला,५८२, अंडेवाला रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९

२. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहितीसाठी सादर.

३. श्री. सी. एफ. जयस्वार, अव्वल कारकून, महसूल शाखा

२/- आपणास यापूर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे या कार्यालयाचे पथकामार्फत वरचेवर स्थळपाहणी करुन परवानाधारक यांनी केलेल्या गौणखनिजांचे उत्खननाची मोजमापे घेऊन जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कार्यवाही करण्यात यावी.

30/08/2017

31 AUG 2017